# माझे श्वान प्रशिक्षणातील अनुभव

- तेजराव  डॉ. त्र्यंबकराव भगत,

माजी अपर पोलीस अधीक्षक, मुख्य श्वान अध्यापक

कुत्र्याच्या किंवा माणसाच्या स्वभावाला औषध नाही असे म्हटले जाते. ते काही प्रमाणात खरे असले तरी कुत्र्यांना लहानपणापासून शिक्षण दिल्यावर बऱ्याच प्रमाणात त्यांच्या सवयींत आपण बदल घडवू शकतो हेही खरे आहे. त्यांना आज्ञापालनाचे धडे दिल्यानंतर ते आपली आज्ञा पाळतात. या कुत्र्यांना नीट प्रशिक्षण दिल्यानंतर ते आपणास हवे तसे वागतात. त्यांना करावयास सांगितलेली क्रिया ते करतात. प्रशिक्षणाचे चांगले परिणाम दिसण्यासाठी आपणास एकच पथ्य पाळावे लागते, ते म्हणजे शिकविलेल्या क्रियांचा कुत्र्यांकडून अधून मधून नित्य सराव चालू ठेवावा लागतो. पोलीस दलातील श्वान पथकांतील कुत्र्यांसाठी स्वतंत्र, त्यांना हाताळणारे कर्मचारी असतात. त्यांचा सराव सकाळ, सायंकाळ घेणे बंधनकारक असते. म्हणूनच ते एकाच आज्ञेवर या कर्मचाऱ्यांचे ऐकतात व ती क्रिया करून दाखवितात. या उलट घरात पाळलेले कुत्रे प्रशिक्षणानंतर त्याचा नित्य सराव घेतला जात नसल्याने त्या प्रमाणात प्रतिक्रिया देत नाही. त्यांना एकाच क्रियेसाठी त्यांचे मालक चार चार वेळा आज्ञा देतात, त्यावेळी ते कधी लवकर त्या आज्ञांचे पालन करतात व काही वेळा त्या आज्ञा पाळतच नाहीत. म्हणूनच पाळीव कुत्र्यांना प्रशिक्षण देणे फायद्याचे आहे, पण त्यांच्याकडून आज्ञापालनाची अपेक्षा असेल तर मालकांनी सरावाकरिता अधून मधून का होईना, थोडा वेळ दिला पाहिजे. कुत्रा आपले ऐकतो, आपल्या नियंत्रणात राहतो हा आनंद वेगळाच असतो.

नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयात दुसऱ्या वर्षाला शिकत असताना मी पोलीस उपनिरीक्षकाच्या जागेसाठी स्पर्धा परीक्षा दिली. त्यात माझी निवड झाली. दन वर्षे नाशिक येथील शिस्तबध्द प्रशिक्षणानंतर माझी नागपूर शहर पोलीस दलात नेमणूक झाली. पाच वेषे विविध पोलीस स्टेशनात काम करताना पोलीस श्वान पथकांचा जवळून संबंध आला. छशुवैद्यक शास्त्राच विद्याथी असल्याने श्वानपथकातील सोवेची आवड निर्माण झाली. आपणही हे प्रशिक्षण घ्यावे व या पथकात नेहमीसाठी सेवा करावी असे वाटले. मात्र मला पशुवैद्यक शास्त्राच अभ्यासक्रम करून व्हेटरर्नरी डॉक्टरसुध्दा व्हावे असे वाटत होते. पोलीस खात्याच्या परवानगीने मी १९८२ मध्ये पुणे येथील श्वान प्रशिक्षण केंद्रात तयावेळचे मुख्य श्वान प्रशिक्षक श्री. दायमा साहेब यांच्याकडून श्वान प्रशिक्षणाचे धडे घेतले व तीन महिनेयांचा हा अभ्यासक्रम मी पूर्ण केला. १९८५ मध्ये मी प्राण्यांचा डॉक्टरही झालो. पाठोपाठ नागपूर शहरात श्वानपथक स्थापन झाले व तेथेच माझी श्वान अध्यापक म्हणून नेमणूकही झाली.

तेथे तीन श्वानांचा सांगण्यासारखा अनुभव आला. डॉबरमन पिंश्चर श्वान लक्ष्मी, मुधोळ हाउंड श्वान सॅम्सन व डिलायला यांचा त्यांच्या हॅंडलरसह आम्ही रोज सकाळी व सायंकाळी वेगवेगळ्या ठिकाणी सराव घेत होतो. हे श्वान आज्ञाधारक तर होतेच, त्याचबरोबर गुन्हेगारांचा माग काढण्याच्या कामातही ते तरबेज होते. लक्ष्मी या डॉबरमन श्वानाने हॅंडलरश्र ी डागरे यांच्या सोबत दोन खुनाचे गुन्हे व एक बलात्काराच्या प्रकरणात तसेच एक दरोड्याच्या गुन्ह्यांत गुन्हेगार पकडून देण्यासाठी

चांगली मदत केली. तपासकामात पोलिसांना श्वानांचा चांगला उपयोग होतो यावर माझा त्यामुळे विश्वास बसला. १९८६मध्ये माझी पदोन्नतीवर मुंबई पोलीस दलात गुन्हे शाखेच्या श्वानपथकात पोलीस निरीक्षक व ज्येष्ठ श्वान अध्यापक या पदावर नेमणूक झाली. १९८६ ते १९९४ या कालावधीत या पथकातील डॉबरमन श्वान मोती व त्याचे हँडलरश्र ी. पडवळ तसेच बाँबशोधक श्वान जंजीर या लरब्राडोर जातीच्या श्वानाचा फार चांगला उपयोग झाला. मोतीने एका चोरी व दरोड्याच्या गुन्ह्यात गुन्हेगाराचा माग काढून दाखविला होता. १९९३मध्ये मुंबईत एकाच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी ज्या बाँबस्फोटांचय घटना घडल्या, त्यावेळी श्वान जंजीर व त्याचे हँडलरश्र ी. राजपूत व श्री. ओंधळ यांच्या सोबत मी स्वतः त्या जागांची तपासणी केली दादर रेल्वे स्थानकाच्या पूर्व बाजूला रस्त्यावर एका दवाखान्यासमोर एक स्कूटर आढळली. त्या स्कूटरच्या डिकीजवळ सर्वप्रथम श्वान जंजीरने त्यात स्फोटके असल्याचा इशारा दिला. विमानतळावरील बाँबशोधक पथकाने तपासणी केली असता त्या डिकीत साधारणतः २० किलो आर डी एक्स ठेवलेले आढळले. नंतर ते आर डी एक्स दक्षतेने नेऊन श्री जाधव यांच्या पथकाने त्याचा समुद्राजवळ नाश केला. तसेच जव्हेरी बाजारात व्हीटी स्टेशनजवळच हातगाडीवर स्फोट करम्याकरिता अतिरेक्यांनी ठेवलेला आर डी एक्सचा साठाही श्वान जंजीरने भुंकून आमच्या नजरेस आणला होता.

मुंबईत स्थानिक केनेल क्लबतर्फे दरवर्षी डॉग शो आयोजित होतात. मुंबईच ओबीडियन्स शो चांगला होतो. त्यात खाजगी श्वान प्रशिक्षक त्यांचे स्वतःचे वा मालकांचे वेगवेगळ्या जातींचे श्वाने घेऊन येतात. साधारणतः २५ ते ३० श्वान या आज्ञापालनाच्या प्रदर्शनात भाग घेतात. जे श्वान चांगले प्रशिक्षित असतात, त्यांचा नियमित सराव घेतला जातो. तेच श्वान या स्पर्धेत चांगले प्रदर्शन करतात व बक्षिसे मिळवितात.

१९८६मध्ये हैदराबाद येथे झालेली अखिल भारतीय पोलीस श्वानांची स्पर्धा पाहण्याची संधी मिळाली. त्याचा बारकाईने अभ्यास केला. १९९४ मध्ये पदोन्नतीव जेव्हा माझी राज्य पोलीस श्वानपथक व प्रशिक्षण केंद्राचा मुख्य श्वान प्रशिक्षक म्हणून मुंबईवरून बदली झाली, त्यावेळी वरील डॉगशोच्या अनुभवाचा मला पुणे येथील श्वान प्रशिक्षण केंद्रात श्वान व त्यांचे हँडलर्स अशा स्पर्धा परीक्षांकरिता प्रशिक्षित करून त्यांचा सराव घेण्यासाठई मला फार उपयोग झाला. याचाच फायदा असा झाला की १९९५ ते २००० दरम्यान अखिल भारतीय पोलीस श्वांच्या कर्तव्य मेळाव्यात चंडीगड, पंजाब येथे सुलतान या डॉबरमन पिंश्चर व हँडलर श्री.बोकील यांना सुवर्णपदक मिळाले. नागपूरची लॅब्राडोर श्वान शेरी व हँडलर श्री. बनसोडे यांना रौप्य पदक, श्वान सुलतानला पुन्हा भोपाळ येथील स्पर्धेत डॉबरमन श्वान मादी डॉली व हँडलर श्री. राठोड आणि श्री. कार यांना रौप्य पदक मिळाले. या स्पर्धा कशा प्रकारे होतात, त्यांचे गुण कसे दिले जातात, याची सविस्तर माहिती श्री. विजय भट यांनी कुत्र्यांचे शिक्षण या प्रकरणात दिली आहे.

या पथकाचा प्रमुख म्हणून राज्यपातळीवर सेवा करताना मला असे आढळले की श्वान प्रशिक्षक केंद्रातून चांगल्या प्रकारे प्रशिक्षित होऊन त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी जातात. जे हँडलर आपली कॉलड्युटी सांभाळून आपआपल्या श्वानांचा नित्य सराव घेतात, त्यांचे श्वान आज्ञापालनाचे, सुरक्षेचे व गुन्ह्यांचा तपास लावण्याच्या कामात चांगले वाकबगार होतात. आसेच श्वान व हँडलर्स पोलीस श्वान पथकांची उपयुक्ता सिध्द करतात व प्रशंसेस पात्र ठरतात. पोलीस दलाती श्वान प्रशिक्षक व हँडलर्स लोकांच्या पाळीव श्वानांना प्रशिक्षण देऊ शकत नाहीत. अशी तक्रार जर एखाद्या हँडलरबद्दल आली, तर त्याच्यावर खात्याच्या नियमाप्रमाणे कारवाई होऊ शकते.

इ.स. २००० मध्ये मला चेहऱ्याला लकवा झाला होता. नंतर तो ठीक झाला, परंतु मला आरोग्याच्या दृष्टीने महाराष्ट्रभर श्वानपथकांचे दौरे करण्यास मनाई केल्याने मी ४८व्या वर्षी अपर पोलीस अधीक्षक व मुख्य श्वान अध्यापक या पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतली. त्याच वर्षी मला पुण्यातील एचईएमआरएल या सैन्य दलाच्या पाषाण येथील संशोधन प्रयोग शाळेत सुरक्षेसाठी, बॉंबशोधण्यासाठी सहा श्वानांचे पथक तयार करण्याचे व व त्यांच्या प्रयोगशाळेत याचा उपयोग करण्याचे दोन वर्षांसाठी काम मिळाले. पोलीस श्वान पथकात श्वानांचा वापर मुख्यतः गुन्हेगारांचा माग काढणे, बॉंब शोधण्यासाठी होतो. परंतु या प्रयोगशाळेतील श्वानांना गार्डिंग-सुरक्षेच्या कामावर लक्ष देण्यासाठी गस्तीवर सुरक्षारक्षकांच्या सोबत रात्री गस्तीवर पाठविण्यासाठी खास करून प्रशिक्षित करावे लागले. पोलीस पथकातील श्वानांप्रमाणे २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या दिवशी प्रयोगशाळेतील अधिकारी व कर्मचारी यांना या श्वानांच्या आज्ञापालनाची, सुरक्षेची तसेच उंच अडथळ्यावरून, आगीच्या रिंगमधून उजी मारण्याची प्रात्यक्षिके दाखविली. तसेच या श्वानांना स्थानिक डॉग शोमध्ये प्रदर्शनात भाग घ्यायला लावून त्यांनी बक्षिसे देखील मिळविली होती. दोन वर्षांच्या कालावधीत हा प्रयोग यशस्वी झाला. या कामात मला मान.य सहाय्यक प्रशिक्षक श्री उल्हास कुलट, विनेद आणि अनिल या प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य मिळाल. लष्करातील निवृत्त मेजर जनरल श्री.शशिकांत पित्रे व ब्रिगेडियर श्री. अनिल आपले पुण्यात स्थायिक झाल्यावर त्यांनी होरायझन नावाची एक स्वयंसेवी संस्था स्थापन केली. या संस्थेचे काम म्हणजे श्रीलंकेत युध्दाच्या वेळी ओलटीटीई व लष्कराने शेतात, जंगलात, जमीनीत पुरलेले भू सुरुंग शोधून नष्ट करणे. मानवतावादी दृष्टिकोनातून हे काम संयुक्त राष्ट्र संघाच्या देखरेखीखाली वेगव ेगळ्या देशांत केले जाते. यासाठी सेवानिवृत्त लष्करी अधिकारी व कर्मचारी हे काम करतात. या कामात भूसुरुंग शोधण्यासाठी श्वान व दोन हॅंडलर्स प्रशिक्षित करून हवे होते. त्यासाठी टरवून दिलेली स्टॅंडर्ड ऑपरेशन पध्दत वापरणे आवश्यक होते. या पध्दतीचा आराखडा पित्रे साहेब यांनी मला समजावून सांगितला. त्यानुसार मी दोन श्वान व हॅंडलर्सना प्रशिक्षित करण्याचे काम मी पुण्यातच सुरू केले. पित्रे साहेब व आपटे साहेब या प्रशिक्षण कामाची पाहणी प्रशिक्षण स्थळी करत व आवश्यक त्या सूचनाही करत. चशिक्षणानंतर दोन श्वान जर्मन शेफर्ड आकाश व पृथ्वी यांच्यासह ह्ंडलर्स श्री अनिल चव्हण व विनोद सदाशिव यांना मी श्रीलंकेच्या विमानातून तेथील वावूनिया या जिल्ह्याच्या ठिकाणी पोहोचविले. हा एलटीटीईचा भाग असल्याचे आम्हास सांगण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव आम्हाला आमच्या बरॅकच्या बाहेर दोन दिवस जाू दिले नाही. त्यानंतर श्रीलंकेच्या लष्कराकडून खऱ्या स्फोटकांचे, भूसुरुंकांचे नमुने आम्हाला देण्यात आले. त्यावरून ते दोन श्वान व हॅंडलर, होरायझनचे इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यासह प्रत्यक्ष युध्द झाले त्या भागात भूसुरुंग शोधण्याच्या प्रशिक्षणाचा श्वानांकडून सराव करून घेतल. हे काम खरे तर फारच जोखमीचे होते. त्यात जर कुत्र्याकडून किंवा हॅंडलरकडून चूक झाली, भूसुरुंगावर जर पाय पडला तर जीवित हानीही होऊ शकली असती. म्हणून या कारवाईशी संबंधित सर्वांचा मोठ्या रकमेचा विमा तर उतरविला गेलाच होता, त्यांना चांगले वेतनही दिले जात होते. आमचे श्वान पृथ्वी व आकाश या कामी सुरुवातीला स्थिरावत असताना दुसऱ्या राष्ट्राच्या टीममधील श्वानपथकास एक अपघात झाला. त्या घटनेनंतर या भूसरुंग शोधण्याच्या व नष्ट करण्याच्या मोहिमेतून श्वानपथकांचे काम तात्पुरते स्थगित करण्यात आले व आम्हाला भारतात पाठविण्यात आले. मात्र हा अनुभव मला व माझ्या बरोबर काम करणाऱ्या दोन हॅंडलर्सना खूप काही शिकवून गेला.

श्वानांना जर शिस्तबध्द पध्दतीने चांगले प्रशिक्षण दिले गेले तर हेच श्वान मानवतावादी दृष्टिकोनातून जोखमीचे काम देखील निमूटपणे करतात. त्या मुक्या प्राण्यांना मात्र हे काम किती जोखमीचे आहे व आपण का व कोणाकरिता करतो याची बिलकुलही कल्पना नसते. भारतीय श्वानपथक श्रीलंकेत हे काम करते, त्यांची पाहणी श्रीलंकेचे संरक्षण मंत्री

करतात, या पथकातील दोन श्वान व अधिकारी तसेच कर्मचारी हे संरक्षण मंत्र्यांना मानवंदना देतात व प्रात्यक्षिके दाखवितात हा प्रसंग तेथील दूरचित्रवाणीवर दोन दिवस सतत दाखविला गेल्याचे आम्हाला नंतर समजले. श्रीलंकेतील या कामाच्या आठवणी आमच्या कायमच्या स्मरणात राहिल्या आहेत. शेवटी मेजर जनरल श्री शशिकांत पित्रे साहेब ब्रिगेडियर अनिल आपटे साहेब यांनी आम्ही होरायझनसाठी श्रीलंकेत चांगले काम करण्यासाठी केलेल्या यशस्वी प्रयत्नांबद्दल आम्हा सर्वांना चांगल्या कामगिरीचे प्रशस्तिपत्रक देऊन सत्कार केला. आम्ही केलेल्या कामाचे व प्रयत्नांचे सार्थक झाल्याचे समाधान आम्हाला वाटले. भविष्यात अशा प्रकारची संधी मिळाल्यास आणखी काम करण्यास तयारी असल्याचे आम्ही श्री. पित्रे साहेब यांना सांगितले व त्यांचा निरोप घेतला.

पुण्यातील सैन्यदलाच्या संशोधन प्रयोगशाळेत इ.स. २००० ते २००२ दरम्याने सुरक्षाकामी केलेला गार्ड डॉग स्क्वॉडचा प्रयोगही यशस्वी झाला होता. आता २००४च्या सुमारास पुण्यातील औद्योगिक कंपन्यांकडूनही त्यांच्यासाठी असेच सुरक्षेसाठी श्वान व हँडलर्स प्रशिक्षित करून देण्याबाबत मागणी येऊ लागली. कंपन्यांमध्ये त्यांचा स्वतंत्र सुरक्षा विभाग असतो. कंपन्यांतीलचोऱ्यांचे प्रमाण कमी करून त्यास आळा घालण्यासाठी तेल्कोसारख्या काही ठराविक कंपन्या पूर्वीपासूनच श्वान पथक ठेवत. श्री. विजय भट यांनी कारखान्यांच्या सुरक्षिततेसाठी असे प्रशिक्षित केलेले श्वान कसे उपयोगी पडतात, याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. सुरक्षेसाठी श्वान प्रशिक्षित करण्यापूर्वी या कामास योग्य असेच श्वा निवडावी लागतात. डॉबरमन पिंश्चर, जर्मन शेफर्ड(अल्सेशियन) रॉटविलर या जातीच्य श्वानांमधून दणकट, मजबूत बांध्याचे. धिप्पाड,शारीरिक व्यंग नसलेले, रागीट स्वभावाचे श्वान निवडावे लागतात. यासाठी एक वर्षापर्यंत पिल्लाचे वय झाल्यावरच त्यात या निवडीसाठई आवश्यक असणाऱ्या बाबी पाहिल्य ाजाऊ शकतात. जर लहान, दोन ते चार महिन्यांचे पिल्लू निवडले, तर त्यास सुरुवातीपासूनच इतर माणसे व श्वान यांच्यापासून लांब ठेवून वाढवावे लागते.ते श्वान जास्त माणसाळू नयेत यासाठी हे करणे आवश्यक ठरते. माणसाळलेले श्वान बहुतेक सर्वांचे शेपटी हलवून स्वागतच करताना दिसतात. तसे होऊ नये यासाठी ही खबरदारी.

श्वानांच्या प्रशिक्षणात प्रथम तीन महिन्यांचे आज्ञाधारकपणाचे प्रशिक्षण त्यांच्या हँडलरसह दिले जाते. त्यानंतर पुढील तीन महिन्यांत गार्डिंग(संरक्षण), अटॅकिंग(हल्ला) करणे यांचे विशेष प्रशिक्षण दिले जाते. यात कंपनीतील वस्तूंची सुरक्षा करणे, तसेच गुन्हेगारांचा माग काढणे,वेळप्रसंगी गुन्हेगारास पाठलाग करून पकडणे यासारख्या धड्यांचा समावेश असतो. या श्वानांस प्रत्यक्ष काम करताना उडी मारून मार्गात आलेले अडथळे पार करण्याचे प्रशिक्षणही दिले जाते. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या अडथळ्यांवरून, उंचावरून उडजी मारणे शिकविले जाते. या/शिक्षणाबरोबरच या श्वानांची योग्य ती निगा राखून त्यांचे चांगले संगोपन कसे करावे हे देखील त्यांच्या हँडलर्सना शिकविले जाते. मोठमोठ्या शहरातील पंचतारांकित हॉटेले व काही आयची कंपन्यांना देखील सुरक्षा करण्यासाठी प्रशिक्षित श्वान हवे असतात.

इंग्लंड, जमॅनी सारख्या प्रगत राष्ट्रांत पाळीव श्वानांना प्रशिक्षण देण्यासाठी कोचिंग क्लब आहेत. तेथे ठराविक दिवशी श्वानप्रेमी मालकास आपला श्वान घेऊन बोलाविले जाते. अनुभवी प्रशिक्षक श्वान मालकास त्यांच्या श्वानास प्रशिक्षण कसे द्यावे ते प्रात्यक्षिक करून दाखवून देतात. अर्धा ते पाऊण तासाचा असा हा वर्ग असतो. बरेच लोक याचा लाभ घेतात. येथे आपआपल्या श्वानास घेऊन येऊन प्रशिक्षण कसे द्यायचे ते शिकून घरी गेल्यावर आठवडाभर आपआपल्या सोयीच्या वेळेप्रमाणे आपल्या श्वानास रोज अर्धा ते पाऊण तासाचे प्रशिक्षण स्वतः देतात. अशा/ाकार दज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पाळीव श्वानांना प्रशिक्षण दिले जाते. श्री.विजय भट यांनी हा प्रयोग केला. नामांकित ज्येष्ठ श्वान प्रशिक्षक

यांनी मुंबीत महालक्ष्मी रेसकोर्सवर असे प्रशिक्षणाचे वर्ग घेतलेले आहेत काही लोकांनी या सेवेचा लाभ घेतलेला आहे. मी देखील अनेक श्वानपालकांच्या व त्यांच्या मुलांच्या विचारणेवरून असा प्रशिक्षण वर्ग २२ जुलै २००४ रोजी चिंचवड येथे आयोजित केला. त्यावेळचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री दिलीप बंड यांच्या हस्ते करण्यात आले. श्री.विजय भट यांनी कारखान्यांची सुरक्षा प्रकरणात उल्लेक केलेले टेल्को कंपनीचे मुख्य सुरक्षा अधिकारी श्री वाडेकर साबेर देखील यावेळी उपस्थित होते. या उद्घाटनप्रसंगी पोलीस श्वान पथकाप्रमाणेच मी स्वतः प्रशिक्षित केलेले आकाश व पृथ्वी हे जर्मन शेफर्ड श्वान व रंजन हा लॅब्राडोर श्वान यांची शानदार प्रात्यक्षिके दाखविली. तेथे आठवड्याभरात सात आठ प्रशिक्षणार्थींनी उत्साहाने आली नावे नोंदविली. आठवड्यातून एकदा त्यांचा वर्ग ठेवण्यात आला. तीन महिन्यांच्या या प्रशिक्षणा दरम्यान शेटपर्यंत फक्त तीन विद्यार्थी टिकले.ज्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले त्यात महेश सुतार, इचलकरंजी, आकाश, पुणे व जयंत काळे, निगडी यांचा समावेश होता. यातील महेश सुतार व जयंत काळ यांनी या प्रशिक्षणाचा फायदा घेऊन स्वतः वेगवेगळ्या ठिकाणच्या डॉगशोमध्ये स्वतःचा श्वान हाताळून तसेच नवीन नवीन तंत्रे अवगत केली. आज ते डॉगशोच्या क्षेत्रात चांगल्यापैकी स्थिरावले आहेत. दोघांनीही आजवर अनेक बक्षिसे मिळविली आहेत व त्यांनी हाताळलेले काही श्वान डॉगशोमध्ये चँपियनशिपचे मानकरीही जाले आहेत ही या दोघांसाठी व माझ्यासाठीही आनंदाची व अभिमानाची बाब आहे.

आठवड्यातून एकदा प्रशिक्षण वर्गात शिकून मालकानेच आपल्या कुत्र्याचे प्रशिक्षण स्वतः घरीच करावे ही कल्पना फार चांगली आहे. त्याचे फायदेही तसेच मिळतात. परंतु प्रशिक्षण घेण्यासाठी येमारी मंडळी आठवड्यातील ठराविक दिवशी व ठराविक वेळी ये नाहीत. सुरुवाती सुरुवातीला ती उत्साही असतात परंतु कालांतराने त्यातील बरीच मंडळी गळतात. त्याचे एक कारण असे असावे की त्यांना घरी करण्यासाठी गृहपाठही दिलेले असतात. ते प्रामाणिकपणे न केल्याने त्यांचा प्रारंभीचा उत्साह टिकत नाही. असे झाले की शिकविणाऱ्या प्रशिक्षकांनाही त्या निरुत्साहाची बाधा होते. असाच परिणाम माझ्यावरही झाला व मी हा वर्ग बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र मला श्वान पालकांकडून व त्यांच्या मुलामुलींकडूनदेखील अशा वर्गाबाबत सारखी विचारणा होतच असते. श्री. भट यांनीही अशा वर्गात मार्गदर्शन करण्याचे मान्य केले. त्यांच्यातील उत्साह बघून दि. १ सप्टेंबर २०१३ पासून दर रविवारी एक तास थिअरी व एक तास प्रॅक्टिकल असलेला हा वर्ग तीन महिन्यांसाठी मी सुरूही केला.

तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मालकानेच स्वतःचा श्वान स्वतः शिकवावा ही कल्पना फार चांगली आहे. त्याचे परिणाम देखील चांगले आहेत परंतु बहुतेक श्वानप्रेमी नागरिकांना या कामासाठी वेळच मिळत नसल्याने डॉक्टर, तुम्ही आमचा कुत्रा आमच्याच घरी शिकवून देण्याची व्यवस्था करा असे त्यावेळच्या भाजपा नगरसेविका श्रीमती गीताताई आफळे यांनी सुचविले होते. अशीच मागणी बऱ्याच लोकांकडून आल्याने २००४ साली मला त्यात लक्ष घालावे लागले. मी २० ते २५ वयोगटातील पाच मुलांची अक टीम निवडली. त्यांना घरी जाऊन या पाळीव श्वानांना काय प्रशिक्षण त्यावे याचे प्रशिक्षण दिले. त्यापैकी दोघे मध्येच हे प्रळिश्रण सोडून निघून गेले. उर्वरित तिघा मुलांपैकी ोगेश उगले व दत्ता मापारी ही दोघे आज माझ्या देखरेख व मार्गदर्शनाखाली श्वानमालकांच्या घरी जाऊन या श्वानांना तीन महिन्यांचे शिस्तीचे, आज्ञाधारकपणाचे व सुरक्षेचे ठराविक धडे शिकवून प्रशिक्षण देण्याचे काम करतात.

श्वानांना प्रशिक्षण देण्यासाठी मला बोलाविल्यानंतर पहिल्या दिवशी मी श्वानमालकाच्या घरी जाऊन स्वतः श्वानाची तपासणी करतो. श्वानमालकांच्या अडर्ची समजावून घेतो. श्वानमालकांना या प्रशिक्षणाबद्दल सविस्तर माहिती देतो.

त्यांच्या शंकांचे निरसन करतो. त्यानंतरच माझे साहाय्यक त्यांच्या घरी जाऊन हे प्रशिक्षण सुरू करतात. प्रशिक्षणातील पहिल्या टप्प्यानंतर प्रत्येक श्वानाची मी स्वतः चाचणी घेतो. मालकांना श्वानाच्या प्रशिक्षणातील प्रगती दाखवितो व मालकांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना आता श्वान कसा हाताळावा, त्यास आज्ञा देऊन काम कसे करून घ्यावे त्याची प्रात्यक्षिकासह माहिती देतो व स्वतः श्वान हाताळणे सुरू करा म्हणून सांगतो. जे लोक या सूचनंचे पालन करता, अधून मधून त्यांच्या सवडीप्रमाणे सराव घेतात, त्यांना या प्रशिक्षणाचा चांगला फायदा होत सल्याचे आढळून येते. मात्र काही लोक म्हणतात, तुम्ही तुमचे प्रशिक्षक द्या, आम्ही आमचे सरावाचे बघून घेतो. त्यांची अडचण खरी असते. आजच्या धकाधकीच्य ाजगात कुमाला वेळच मिळत नाही. जो तो आपआपल्या कामात इतका गुंतलेला असतो, त्यामुळे हे असे होते. परंतु परिणामी या प्रशिक्षणाचा व्हावा तेवढा उपयोग होत नाही. म्हणून मी लोकांना वरंवार सांगतो की तुम्ही या प्रशिक्षणाच्या उपक्रमात सहभागी व्हा, तुम्हाला ज्यावेळी जे सांगितले जाते तसे करा म्हणजे तुमचे श्वान तुमच्या आज्ञा ऐकतील. यातून तुम्हाला जो आनंद मिळणार आहे, तो अनुभवल्यानंतर आम्हाला सांगा. बरेच लोक आता आमच्या म्हणण्याप्रमाणे करू लागले आहेत.

आम्ही ठरविलेल्या प्रशिक्षणाच्या कालावधीनंतर म्हणजे तीन महिन्यांनंतर मी मालकासमवेत त्या श्वानाची अंतिम चाचणी घेतो. यात मी त्यांच्याकडून शिकविल्याच्या ७५% कामगिरी अपेक्षित करतो. मालकाने देखील यावेळी श्वानांच्या प्रशिक्षणाची कामे घेऊन दाखवावीत अशीही अपेक्षा असते. बरीच श्वानप्रेमी मुले मुली व प्रौढ नागरिकही डॉ. भगत या चाचणीसाठी कधी येणार याची उत्सुकतेने वाट पाहात असतात.

आजच्या काळात घरोघरी चांगल्या जातीचा श्वान ाळण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा खूप वाढले आहे. त्याचबरोबर श्वानांचे चांगल्या प्रकारे संगोपन करण्याबद्दल लोकांत जागरुकता वाढलेली आहे. श्वानप्रेमी लोक फार चौकस बुध्दीने त्यांना हव्या असलेल्या श्वानपिलांची निवड करतात. या कामी बऱ्याचदा अनुभवी लोकांची मदत घेतली जाते. बरेच लोक त्यांना आवड आह म्हणून किंवा त्यांच्या घराचे संरक्षण व्हावे म्हणून कुत्रा पाळतात. त्याच्यावर भरपूर खर्चही करतात. हा खर्च टप्प्या टप्प्याने कसा होतो हे त्यांना कळतही नाही. घरी कुत्रा आल्याने घरातील बहुतेक सर्वजण आनंदी असतात. कुत्रा पाळण्यातील आनंत आणि सुख जास्तीत जास्त उपभोगता यावे याच उद्देशाने श्री विजय भट यांनी संरक्षक सोबती हे पुस्तक लिहिले आहे.

कुत्र्यांना प्रशिक्षण देणे म्हणजे नेमके काय? साध्या व सोप्या भाषेत सांगायचे तर त्यांना असलेल्या वाईट सवयी हळूहळू कमी करून आपल्याला हव्या असेल्या गोष्टी त्यांच्याकडून कृतीत उतरवू घेणे म्हणजेच त्यांना चांगल्या सवयी लावणे होय. कुत्र्यांच्या आवडी निवडी, त्यांच्या डोळ्यातील हावभाव लक्षात घेऊन प्रेमाने, त्यांच्या कलाकलाने त्यांना वेगवेगळ्या आज्ञा देऊन त्यांचे पालन कसे करावे ते शिकविले जाते. हे करताना पाळण्याचे एक पथ्य म्हणजे त्यांना मारून कधीच शिकवू नये. मारून शिकविल्याने ते घाबरत घाबरत ती कृती करतात; आनंदाने करीत नाहीत. आजकाल बऱ्याच लोकांना घरच्या कुत्र्यांना स्वतःच शिकविणे आवडते. त्यासाठी त्यांना योग्य असा मार्गदर्शक मिळायला हवा. काही लोकांना व्यावसायिक श्वान प्रशिक्षक व्हावेसे वाटते. यासाठी चांगल्या अनुभवी, ज्येष्ठ प्रशिक्षकाकडून श्वान प्रशिक्षणाचे धडो घ्यावे लागतात. आपल्या कुत्र्याला शिकविण्यासाठी चांगला प्रशिक्षक मिळावा असे बहुतेकांना वाटते. म्हणूनच चांगल्या प्रशिक्षकांना नेहमीच चांगली मागणी असते. श्वानप्रेमींची आवड वगरच लक्षात घेऊन तसेच कुत्रा घेताना आपले घर कसे व किती मोठे आहे, कोणत्या मजल्यावर आहे, कुत्रा घरी आणल्यावर त्याची काळजी घेण्यास आपण किती वेळ देऊ शकू या सर्व गोष्टी

विचारात घेऊन कोणत्या जातीचा कुत्रा घ्यावा, तो मोठा झाल्यावर किती लहान, मोठ्या आकाराचा होतो त्याचा विचार करून कोणता कुत्रा घ्यायचा ते ठरवावे लागते. असा विचार करून कुत्र्याची निवड न केल्यास श्वानमालकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

आज्ञा देऊन ज्या क्रिया करण्यास श्वानप्रशिक्षक श्वानांना शिकवितात, त्या क्रिया त्यांना उपजतच येत असतात असे जे श्री. विजय भट यांनी म्हटले आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. कुत्र्याला खाली बस म्हटल्यावर तो बसणे अपेक्षित असते. मुळात त्याला बसणे ही क्रिया माहीत असतेच व तो बसतही असतो. प्रशिक्षक काय करतो? त्याला शिकविताना त्याला खाली बस अशी आज्ञा देतो व त्याला हाताने बसवून ही क्रिया करवून घेतो. खाली बसण्याची आज्ञा आणि बलण्याची क्रिया यांचा वारंवार सराव घेतल्याने कुत्र्याला समज येते आणि त्या आज्ञेवर ती क्रिया करण्याची सवय होते. काही दिवसांनंतर त्याला हाताने बसवावे लागत नाही. बस अशी आज्ञा मिळाल्यावर तो स्वतःच बसतो. अशा प्रकारे कुत्र्यांना वेगवेगळ्या आज्ञा कृती करून शिकविल्या जातात. ऊठ, पड, जवळ येत शेकहँड(समोरील पाय आपल्या हातात देणे) कर, थांब, चल(सोबत डाव्या बाजून नीट शिस्तीत चालणे), हळू चालणे, धाव जाणे, वर्तुळात चालणे, खा, पी, झोप, पकड(वस्तू तोंडात पकडणे), स्पीक(भुंकणे), प्ले(खेळणे), गो(जाणे), फाईंड(शोधणे), फेच(वस्तू तोंडात पकडून आणणे), शू,शी कर, क्राऊल(सरपटत जाणे), नो(एखादी गोष्ट न करणे), ड्रॉप(वस्तू तोंडातून सोडणे, साल्यूट(नमस्कार करणे, मानवंदना देणे), बो(सलामी देणे), गार्ड(वस्तूंचे संरक्षण करणे), वॉच(लक्ष देणे), कॅच(पकडणे), अशा अनेक क्रिया कुत्र्यांना प्रशिक्षक शिकवितात.

कुत्र्यांना लहानपणी काही वाईट सवयी असतात. कुठेही शी-शू करणे, बूट-च्पल तोंडात धरून फाडणे, कुरतडणे, पेपर फाडणे, फर्निचर तोडणे, अंगावर उड्या मारणे, या गोष्टी न करण्याबद्दल त्यांना शिकवून अशा मालकांना न आवडणाऱ्या गोष्टींना वेळीच प्रतिबंध केल्याने तसे न करण्याचेही कुत्रे शिकतात. कुत्र्यांची ऐकण्याची, निरीक्षण करण्याची व वास घेऊन तो स्मरणात ठेवण्याची शक्ती हे गुण माणसापेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहेत. याच गुणांचा वापर करून पोलीस दलात , सैन्यात तसेच सुरक्षा दलात कुत्र्यांचा उपयोग सुरक्षेसाठी, गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी व बॉंब तसेच अमली पदार्थ शोधून काढण्यासाठी उपयोग करून घेतला जातो. प्रशिक्षणानंतर नियमित सरावाने ती त्या त्या कामात तरबेज होतात.

श्वानांना आपली भाषा समजत नसली तरी त्यांना शिकविताना उच्चारलेला, आज्ञा दिलेला शब्द ते आठवणीत ठेवतात आणि त्यानुसार कृती करतात. जेवढा जास्त सराव घतला जातो, तेवढे ते त्या कामात निपुण होतात. पोलीस व सैन्य दलात प्रत्येक श्वानास स्वतंत्र हाताळणारा कर्मचारी, हँडलर असतो. त्या हँडलर्सनी त्यांच्या त्यांच्या श्वानांचा सराव सकाळ सायंकाल घेणे बंधनकारक सते. ते त्यांचे कर्तव्यच असते. म्हणूनच त्यांचे श्वान एकदाच त्यांना दिलेल्या आज्ञेवर कृती करतात. मात्र घरात ाळलेल्या पाळीव श्वानांना व्यासयिक प्रशिक्षक प्रशिक्षण देतातत्या कालवधीच त्यांचा सराव घेतला जातो, त्यामुळे असा श्वान त्याच्या प्रशिक्षकाच्या आज्ञा ऐकतो व ती कृती करतो. ते प्रशिक्षण संपले की त्या प्रशिक्षकांचा आणि शिकविलेल्या श्वानांचा संबंध तुटतो. त्यामुळे प्रशिक्षणाचे काम बंद होते. श्वानांच्या मालकांनी प्रशिक्षक शिकविताना काय आज्ञा दिल्या जातात, त्यानुसार तो श्वान कशी कृती करतो, या गोष्टी समजून घेऊन स्वतः त्याचा सराव घेणे गरजेचे असतो. परंतु मालकांना वेळ मिळत नाही वा त्या सरावाचे गांभीर्य कळत नाही त्यामुळे प्रशिक्षण दिलेल्या क्रियांचा व आज्ञांचा सराव होत नाही. म्हणून अशा प्रशिक्षित श्वानांना मालकाने चार पाच वेळा आज्ञा दिल्यावर ती आज्ञा ते कधी ऐकतात, तर कधी ऐकत नाहीत. त्यामुळे आपल्या श्वानाला प्रशिक्षित केले आहे यावर मालकाने समाधान न मानता

आठवड्यातून दोन तीन वेळा सवडीनुसार १५-२० मिनिटे जरी सराव घेतला तरी त्यांच्या श्वानांना देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग होतो.

घरातील श्वानांना खरे तर जास्त प्रशिक्षणाची गरज नसते. त्यांना घरातील शिस्त, आज्ञापालन व सुरक्षेचे काही धडे शिकविणे गरजेचे असते. सराव घेतल्याने श्वान त्याला शिकविलेले विसरत नाही व सरावाने त्याच्या आज्ञापालनात निपुणता येते. आपल्या घरचे श्वान जर शिस्तीत वागले, आपण दिलेल्या आज्ञा त्याने पाळल्या, तर त्यापासून आपल्या कुटुंबास सुरक्षितता तर मिळतेच, त्याचबरोबर त्याच्या आज्ञा पालनाने त्याला जो आनंद मिळतो, तो अवर्णनीय असतो. आपल्या घरातील कुत्रा आपल्या मालकावर व घरातील माणसांवर निरपेक्षपणे प्रेम करतो व आपले रक्षणही करतो.

आपल्या देशात केनेल क्लब आहेत. ते श्वानांचे डॉग शो भरवितात. पोलीस दलातही वेगवेगळ्य ारारयांतील पोलीस श्वानांच्या स्पर्धा होतात. त्यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्या परीक्षणासाठी देश विदेशातील अनुभवी परीक्षकांची नेमूक केलेली असते. हे परीक्षक तुमच्या श्वानांच्या सर्वांगाची तपासणी करतात, निरीक्षण करतात. प्रदर्शनात आलेल्या इतर सर्व श्वानांसोबत तुमचा श्वान कसा उभा राहातो, कसा चालतो, त्याची दातांची रचना बरोबर आही की नाही, त्याचा स्वभाव कसा आहे, त्याला काही व्यंग आहे का ते पाहिले जाते व रागीट, चावऱ्या श्वानांना बाद केले जाते. ऑल ब्रीड शोमध्ये सर्व जातींचय श्वानांची शरीर रचना, सुंदरता पाहिली जाते. आज्ञाधारकपणाच्या म्हणजे ओबीडियन्स शोमध्ये त्यांना दिलेले प्रशिक्षण व त्यांची आज्ञापालनाची क्षमता तपासली जाते. त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक देऊन बक्षिसे दिली जातात. या स्पर्धेत आपला श्वान चँपियन होणे हे मानाचे समजले जाते. त्यासाठी तीन वेगवेगळ्या परीक्षकांकडून तीन चॅलेंज सर्टिफिकेट व बेस्ट ऑफ ब्रीड हे प्रमाणपत्र मिळवावे लागते. आज्ञाधारकपणाच्या चाचणीत श्वान ओबीडियन्स चँपियन होण्यासाठी प्रशिक्षणाच्या प्रकारात एकून ३०० गुणांपैकी २९० पेक्षा अधिक गुण मिळवावे लागतात. या स्पर्धा खूपच आव्हानात्मक असतात. १९९५ -२००० दरम्यान मी महाराष्ट्राच्या श्वानपथक चमूचा कॅप्टन होतो. या टीममध्ये दरवर्षी पाच श्वान व पाच हँडलर्स भाग घेतात. माझ्या नेतृत्वात या स्पर्धांत डॉबरमन जातीचा श्वान पुण्याचा सुलताना यास एक सुवर्ण, एक रौप्य पदक, शेरी- नागपूरच्या लॅब्राडोर श्वान मादीस बाँबशोध कटात रौप्य पदक, डॉली या डॉबरमन जातीच्या पुण्याच्या अमरावती पथकातील श्वान मादीस एक रौप्य पदक मिळाले आहे. त्यासाठी या श्वानांचे हँडलर्स श्री बनसोड, श्री राठोड व श्री बोकील यांनी त्यासाठी खूप परिश्रम घेतले होते हे मी आवर्जून नमूद करू इच्छितो. पोलीस श्वान पथकातील माझ्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मा. पोलीस महासंचाकांचे सन्मानचिन्ह देऊन १९९९मध्ये माझा सत्कारही झालेला आहे.

माझी एक च्छिा होती की मी एक चांगला शो क्लालिटी श्वान घ्यावा. त्याला चांगले प्रशिक्षण द्यावे व त्याला चँपियन करावे. योगायोगाने म्हणा, नशिबाने म्हणा, मला तसा योगही आला. कोल्हापूरचे श्रि. वीरेन उपाध्याय यांनी मला पाच महिन्यांचे चांगले शो क्वालिटी मिनिएचर पिंश्चरचे पाच महिन्यांचे पिल्लू दिले. मी त्यांच्याकडून ते विकत घेतले. या श्वानाची उंची १२ इंच, वजन तीन ते चार किलो असते त्याच्या या आकाराला साजेसे असे त्याचे नाव मी चिंटू असे ठेवले. त्याची खूप काळी घेतली व त्यास चांगले प्रशिक्षणही दिले. अल्पावधीच चिंटूनेही मला साथ दिली. तो शो साठी तयार झाल्यावर त्यास प्रथम मला गडहिंग्लज, कोल्हापूरच्या डॉगशमध्ये उतरविण्याची संधी मिळाली. या स्पर्धेतील दोन्ही परीक्षकांकडून चिंटूला दोन चॅलेंज सर्टिफिकेट व दोन बेस्ट ऑफ ब्रीड अशी सर्टिफिकेटे मिळाली व नगद २ हजारांचे बक्षीसही मिळाले. त्यानंतर २०१३मधील मुंबी, पुणे, सांगली, कोल्हापूर येथील सर्व डॉगशोमध्ये चिंटूस उतरविले. त्याने

एकूण धमालच केली. त्यास दीन चॅलेंज सर्टिफिकेट, १२ बेस्ट ऑफ ब्रीड , दोनदा टॉप ग्रुपमध्ये प्रथम व द्वितीय अशी बक्षिसे व नगद ३हजार ५शे रुपये मिळाले. पुण्याच्या शोमध्ये तर चिंटूने बाजीच मारली त्यास चक्क सहावे बेस्ट इशो हे बक्षीस मिळाले. मी केलेल्या परिश्रमाचे सार्थक झाल्याचा आनंदही त्याने दिला.

श्वान विश्वातील प्रश्न सोडविताना आलेला एक अनुभव सांगतो. मला पुण्यातील कर्वेनगर भागातून एका गृहस्थांचा फोन आला. त्यांच्या श्वानाचे डॉक्टर लेले यांनी माझ्याशी संपर्क करण्यास त्यांना सांगितले होते. त्यांचा अडीच वर्षांचा लॅब्राडोर त्यांना त्रास देतो असे त्यांचे म्हणणे होते. ते त्यांच्या श्वानास रोज रात्री त्यांच्या इमारतीच्या पार्किंगमध्ये पिंजऱ्यात ठेवत. त्यामुळे इतर सदनिकाधारकांना त्या श्वानाचा काहीच त्रास होत नसे. ते स्वतः वरच्या मजल्यावर राहात असत. सगळे सुरळीत चालले होते, पण गेल्या एक दोन दिवसांपासून त्यांचा श्वान रात्री दोन अडीचच्या सुमारास जोरजोराने भुंकू लागला आहे. तो भुंकू लागल्यावर पहिल्या रात्री ते खाली आले. त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. पण तो भुंकण्याचे थांबत नव्हता. मग त्यांनी त्याला पिंजऱ्याबाहेर काढून थोडे फिरविले. त्याने लघवी केली, शौच केले. नंतर त्याला परत आणून त्याला पिंजऱ्यात बंद केले. ते घरी जाऊन झोपले.

दुसऱ्या दिवशी त्याची पुनरावृत्ती झाली. मग त्यांना रोज रात्रीच त्याच्या भुंकण्याचा त्रास होऊ लागला. त्यांच्या इमारतीतील इतर लोकही वैतागले. कुत्र्याची काहीतरी इतर व्यवस्था करा असे म्हणू लागले. त्या श्वानाचा प्रश्न मी समजून घेतला. फोनवरून त्यांना सल्ला दिला. आठवड्यानंतर त्या गृहस्थांचा मला फोन आला व माझ्या सल्ल्याप्रमाणे कृती केल्यावर श्वान शांत झाल्याबद्दल त्यांनी मला धन्यवाद दिले. मी त्यांना काय सल्ला दिला होता? मी त्यांना म्हणालो की एक प्रश्न सोडविताना तुम्ही दुसरा प्रश्न निर्माण झाला आहे. कुत्रा रात्री भुंकतो, म्हणून तुम्ही त्याला बाहेर काढून फिरवून आणायची सवय लावली. रोजच रात्री असे करावे लागल्याने कोणालाही ते कंटाळवाणेच वाटणार. माझा तर्क असा की काहीतरी आवाज आल्याने कुत्रा प्रथम भुंकू लागला. तो का भुंकतो याची खातरजमा करणे जरुरीचे होते. पण तुम्ही त्याला त्यावेळी बाहेर काढले, फिरवून आणले त्यामुळे तो रोजच रात्री भुकू लागला. आता कुत्रा भुंकला की तुम्ही खाली त्याच्या पिंजऱ्याजवळ या. फार तर त्याच्या नावाने त्याला हाक मारा. काय झाले ते बघा. त्याला फिरायला बाहेर काढू नका. तुम्ही काही काळ तसेच त्याच्या जवळ उभा राहिल्यावर तो शांत होईल. माझ्या म्हणण्याप्रमाणे तो खरेच शांत झाला. एक दोन दिवस असे केल्यावर त्याची भुंकण्याची सवयही बंद झाली.

आपल्या सल्ल्याचा असा उपयोग झाला की जे समाधान मिळते, त्याचा आनंद काही वेगळाच असतो.